फौ.खटला क्र:९८/२०२४    निशाणी क्र.

नासीर खान वि शेख रियाज

**<u>आरोपीचा ३१३ सी.आर.पी.सी प्रमाणे खालील जबाब.</u>**

आरोपीचे नांव —**शेख रियाज अलम**

वय— ३४  वर्ष, धंदा— व्यवसाय,

राहणार— लक्ष्मी मंदीराजवळ, ऑगस्ट कॉलनी, अलमगिर, भिंगार, अहमदनगर.

| | |
|---|---|
| प्रश्न १: | फिर्यादीतर्फे घेण्यात आलेला पूरावा तूम्ही ऐकला का व तो तुम्हाला समजला का? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न २: | फिर्यादी साक्षीदार क्र.१ नासीर गुलाब खान यांचे पुराव्यात असे आले आहे की, आरोपी हे त्यांचे मित्र आहेत. तुम्ही दिनांक २६.०७.२०२३ रोजी फिर्यादीचे घरी आला व तुम्ही त्यांना कांद्याच्या व्यवसायासाठी पैशांची आवश्यकता असल्याचे सांगितले. दोघांमधील मैत्रीच्या संबंधाने त्यांनी तुम्हाला दिनांक २६.०७.२०२३ रोजी एक लाख रूपये रोख दिले.  याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ३: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही सदर रक्कम ८ ते १० दिवसात परत करण्याच्या अटीवर तुम्हाला त्यांनी सदर रक्कम देवु केली. तरी देखील तुम्ही त्यांची एक लाख रूपये रक्कम परत केली नाही. तुम्हाला वारंवार मागणी केल्यानंतर तुम्ही त्यांना धनादेश दिला. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. सिक्युरीटी म्हणुन फिर्यादीला चेक दिला होता. |
| प्रश्न ४: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदर धनादेश बॅकेमध्ये अकॉट क्लोज्ड या शे—यासह वटला नाही. तुमच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने सदर धनादेश वटला नाही व तो परत आला. याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | मी फिर्यादीला अकॉट क्लोज असल्याबाबत सांगितले होते. |
| प्रश्न ५: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादीने तुम्हाला दिनांक १५/११/२०२३ रोजी नोटीस पाठवली. सदर नोटीस तुम्हाला दिनांक १८/११/२०२३ रोजी मिळाली. तरी देखील तुम्ही मुदतीत पैसे परत दिले नाहीत करीता फिर्यादीने तुमचे विरुध्द सदरची केस निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दाखल केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |

| | |
|---|---|
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ६: | फिर्यादी नासीर गुलाब खान हे तुमच्या विरूध्द का सांगतात? |
| उत्तर : | खोटी साक्ष दिली. |
| प्रश्न ७: | नि.क्र.१६ वरील धनादेशाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ८: | नि.क्र.१७ वरील बॅकेचे चलनाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ९: | नि.क्र.१८ वरील रिटर्न मेमोबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न १०: | नि.क्र.१९ पोस्टाची आर.एल. पावतीबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ११: | नि.क्र.२० वरील नोटीसबदद्ल तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | मला नोटीस मिळाली होती. |
| प्रश्न १२: | नि.क्र.२१ वरील पोस्टाची पाहोच पावतीबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे |
| उत्तर : | नोटीस मिळाल्याबाबत मी सही केली होती. |
| प्रश्न १३: | तुम्हाला स्वत:ला शपथेवर तपासायचे आहे काय किंवा अन्य साक्षीदार तपासायचे आहेत काय? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न १४: | तुम्हाला बचावाखातर काही कागदपत्र दाखल करावयाचे आहेत काय? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न १५: | प्रकरणबाबत आणखी काही सांगावयाचे आहे का? |
| उत्तर : | खोटी केस दाखल केली. गाडीच्या व्यवहारात सिक्युरीटी म्हणुन फिर्यादीला धनादेश दिला होता. |

समक्ष

..............................

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

आरोपीची सही/आंगठा

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०४, अहदमनगर

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा उपरोक्त जबाब माझ्या समक्ष नोंदविण्यात आला असून तो त्याने सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

दिनांक : ३१/१०/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०४, अहदमनगर